# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दू. क्र. : ०२२ ६६४०५०६६, ६६४०६०६७, ६६४०५०७७ संकेतस्थळ : https://mhada.gov.in


===============================================================================

जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/ १९९२ दि. १४/०७/२०२१

प्रसिद्धी पत्रक

# म्हाडा व एचडीएफसी लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार

## सदनिका सोडतीतील विजेत्यांना गृहकर्जाचा पर्याय उपलब्ध

मुंबई , १४ जुलै, २०२१ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) अंतर्गत मुंबईसह विविध विभागीय मंडळातर्फे काढण्यात येणाऱ्या सोडतीतील सदनिका विजेत्यांना गृहकर्ज सुलभरित्या मिळवून देण्याकरिता म्हाडा व हौसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन (एचडीएफसी) लिमिटेड यांमध्ये आज सामंजस्य करार (MoU ) करण्यात आला.

वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात म्हाडातर्फे वित्त नियंत्रक विकास देसाई व एचडीएफसी लिमिटेडतर्फे सहमुख्य महाव्यस्थापक अजय सचदेव यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण मंत्री श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या संकल्पनेतून व म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर सुविधा सोडतीतील विजेत्या अर्जदारांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. म्हाडाद्वारे परवडणारी घरे सर्वसामान्यांना उपलब्ध करून दिली जातात त्याचप्रमाणे सोडतीतील विजेत्या अर्जदारांना घर खरेदीसाठी परवडणाऱ्या व्याजदरात, सुलभ रितीने गृहकर्ज उपलब्ध व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सोडतीतील विजेत्या अर्जदारांना संबंधित वित्त संस्थेकडून गृहकर्ज घेणे बंधनकारक नसून गृहकर्जासाठी हा एक केवळ सुलभ पर्याय म्हणून उपलब्ध करून देण्यात आला आहे.

याप्रसंगी श्री. देसाई म्हणाले की, म्हाडाच्या सोडतीतील सदनिका विजेत्यांना गृहकर्ज सुलभरीत्या उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा सामंजस्य करार करण्यात आला आहे. म्हाडाच्या सदनिका विजेत्यांकडून गृहकर्जासाठी अर्ज करतेवेळी एचडीएफसी लिमिटेडतर्फे कोणतेही डॉक्युमेंटेशन शुल्क आकारले जाणार नाही. तसेच गृहकर्ज प्रक्रियेकरिता म्हाडाच्या सोडत विजेत्यांकडून केवळ रु. २ हजार ५०० शुल्क आकारले जाणार असल्याचे श्री. देसाई यांनी सांगितले. तसेच ग्राहक सेवा लक्षात ठेवता म्हाडातर्फे दर तीन महिन्यांनी एचडीएफसी लिमिटेड तर्फे नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा आढावा घेतला जाणार आहे, अशी माहिती श्री. देसाई यांनी याप्रसंगी दिली.

एचडीएफसी लिमिटेड ही एचडीएफसी बँकेचा एक उपक्रम असून राज्यात ७६ शाखा कार्यरत आहेत. याप्रसंगी श्री. सचदेव यांनी सांगितले की, म्हाडा ही देशातील गृहनिर्मिती क्षेत्रातील अग्रेसर संस्था आहे. राज्यातील नागरिकांचा म्हाडाच्या गृहनिर्मिती व कार्यप्रणालीवर विश्वास आहे. हा विश्वास जोपासण्याचा आमची संस्था पूर्णपणे प्रयत्न करेल.

यावेळी म्हाडाचे लेखाधिकारी रोनाल्ड वाझ, एचडीएफसी लिमिटेडचे सहाय्यक महाव्यस्थापक अभिषेक देसाई आदी उपस्थित होते.

वैशाली गडपाले
मुख्य जनसंपर्क अधिकारी/ प्राधिकरण



-----******----